ePaper
राज्याच्या काही भागांत थंडीची चाहूल; पुढील तीन दिवस किमान तापमानात घटीचा अंदाज

| वर्ष - 7 | अंक - 192 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 20 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत


- ऑस्ट्रेलियाचा विजयाचा षटकार
- अनुष्का शर्माचीही डोळे पाणावले
- ....एकमेकांना बाद करत आहेत!
- मला सुप्रिया ताईंचा फोन आला!


# मनोज जरांगे-भुजबळांच्या नुरा कुस्तीने भाजपचा फायदा!

## सुषमा अंधारेंकडून आरक्षणाच्या लढाईमागील राजकारणाची चिरफाड

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मुद्द्यावरुन वातावरण चांगलेच तापले आहे. मात्र, छगन भुजबळ यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्रं देऊन त्यांना ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्यास विरोध केला आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी छगन भुजबळ यांना एक जाहीर पत्र लिहले आहे.**




सर परवा झालेल्या सभेमध्ये तुमचं झालेलं भाषण मी किमान दोन-तीन वेळा ऐकलं. प्रत्येक मुद्दा फार काळजीपूर्वक ऐकला. काही मुद्दे मला पटले सुद्धा. बीड मधील जाळपोळ हिंसाचार हा पूर्वनियोजितच होता. त्या हिंसाचाराचे समर्थ न कोणीही करू शकत नाही. पण बीड ची जाळपोळ घडवणारे ते मराठा आंदोलकच होते हे कशावरून? जाणीवपूर्वक मराठा आंदोलनाला गालबोट लावण्यासाठी दुसऱ्याच कुणीतरी हात धुवून घेतला नसेल कशावरून जसे भीमा कोरेगाव प्रकरणात झाले. मनोज जरांगे यांच्या पहिल्या उपोषणानंतर झालेला लाठीमार, गोळीबार किंवा दुसऱ्यांदा बिड मध्ये झालेली जाळपोळ याला जरांगे जबाबदार आहेत असे सांगताना फडणविस गृहमंत्री म्हणुन पुरते अपयशी ठरले हे का सांगितले नाही, असा सवाल सुषमा अंधारे यांनी छगन भुजबळांना पत्रातून विचारला.

### मराठा आरक्षण ही केंद्र सरकारची जबाबदारी

» कालच्या सभेत तुम्ही आरक्षणाचा प्रश्न हा राज्याशी संबंधित नाही तर तो केंद्र सरकारशी संबंधित आहे. कारण मूलभूत हक्काशी संबंधित कलमांमध्ये जर दुरुस्ती करायची असेल तर तो अधिकार कलम 368 (क) नुसार फक्त आणि फक्त केंद्र सरकारला आहे हे सांगणे गरजेचे होते. तमिळनाडू मध्ये 50% पेक्षा जास्त आरक्षण का आहे? कसे आहे ? ते कोणत्या परिस्थितीत झाले आणि तो कायदा नंतर नवव्या परिशिष्टामध्ये कसा समाविष्ट करण्यात आला ? हे आपण जरांगे यांच्या पेक्षा जास्त शिकलेले आहात या नात्याने तमाम ओबीसी आणि मराठा बांधव दोघांनाही समजावून सांगणे अपेक्षित होते. पण आपण ओबीसींच्या बाजूने ओबीसींचे प्रश्न मांडण्यासाठी किंवा ओबीसींचे आरक्षण वाचवण्यासाठी नाही तर व्यक्तिगत टीकाटिप्पणी करून चिथावणी देत आहात असे वाटले, असे मत सुषमा अंधारे यांनी पत्रात मांडले आहे.

### राज्य सरकारच्या दुटप्पी भूमिकेवर सुषमा अंधारेंची टीका

» एकीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हणायचं की, शिवछत्रपतींची शपथ मी मराठ्यांना आरक्षण देणार आहे तर दुसरीकडे फडणवीस यांनी सांगायचे की मी ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही. एकीकडे मराठा आरक्षणाच्या विरोधात फडणवीसांना श्रद्धेय म्हणणारे गुणरत्न सदावर्ते यांनी याचिका दाखल करायची तर दुसरीकडे मराठा आरक्षणाच्या विरोधात संघाचा समर्थक असणाऱ्या सराटे नावाच्या माणसाने याचिका दाखल करायची. एकीकडे भाजपमधीलच काही लोकांनी धनगर आरक्षणाची मागणी करायची आणि आम्हाला एसटीतून आरक्षण हवे आहे म्हणायचे तर दुसरीकडे आमदार नरहरी झिरवाळ यांनी त्या आरक्षणाला विरोध करत असे झाले तर आमचे २५ आमदार राजीनामा देतील अशी धमकी द्यायची. एकीकडे आम्ही मराठा आरक्षणाच्या सोबतच आहोत असे उपोषण स्थळी जाऊन संदिपान भुमरे, अतुल सावे किंवा गिरीश महाजन यांनी सांगायचे तर दुसरीकडे जरांगेचा बोलविता धनी कोण असा प्रश्न विचारत तूम्ही स्वतः, नितेश राणे आणि दरेकर यांनी विरोध करायचा.

---

# कार्तिकी एकादशीच्या महापूजेवरून मराठा समाजात फुट!

## एका गटाचा विरोध मावळला तर दुसऱ्या गटाचा विरोध कायम

। पंढरपूर। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कार्तिकी एकादशीची शासकीय महापूजेला उपमुख्यमंत्र्यांना विरोध करणाऱ्या सकल मराठा समजामध्ये फुट पडली आहे. कार्तिकी एकादशी गुरुवारी (दि.२३) असून मराठा समाजाचा एक गटाने उपमुख्यमंत्री महापूजेला आल्यास आमचा विरोध नाही, अशी भूमिका पत्रकार परिषदेतून मांडली. तर दुसऱ्या गटाने जर उपमुख्यमंत्री महापूजेला आले तर आडवणार अशी भूमिका जाहीर केली. दरम्यान, या शासकीय पूजेसाठी दोन उपमुख्यमंत्र्यांपैकी कोणाला आमंत्रित करावे, या बाबतचा विधी व न्याय विभागाचा अभिप्राय श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला अद्याप प्राप्त झालेला नाही.**



कार्तिकी एकादशीची शासकीय महापूजा कोणत्या ना कोणत्या कारणाने वादात राहिली आहे. मराठा समजाला आरक्षण मिळावे या करिता उपमुख्यमंत्री अथवा कोणताही मंत्री यांना महापूजेस येण्याबाबत विरोध केला होता. मात्र सकल मराठा समाजाच्या वतीने पत्रकार परिषद घेऊन सरकार सकारत्मक आहे. लाखो बांधवांना दाखले मिळाले आहेत. त्यामुळे उपमुख्यमंत्री यांनी महापूजेस यावे तसेच विठ्ठला चरणी हात ठेवून मराठा समाजाला आरक्षण देण्यास शंभर टक्के कटिबद्ध आहोत, असे जाहीर करावे, अशी मागणी सकल मराठा समाज व क्रांती मोर्चाने जाहीर केली. या वेळी माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, दीपक वाडदेकर, संतोष कवडे, विनोद लटके, सुमित शिंदे आदी उपस्थित होते.

### परिस्थितीला सरकार जबाबदार

» या बाबत एक निवेदन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी यांना दिले आहे. मात्र या भूमिकेला मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक रामभाऊ गायकवाड यांनी उपमुख्यमंत्री यांनी शासकीय महापूजेस येवू नये, हट्टाने आले तर होणाऱ्या परिस्थितीला सरकार जबाबदार असल्याचे सांगितले. आमचा विरोध कायम असल्याची भूमिका गायकवाड यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना जाहीर केली.

# बागेश्वर महाराज यांच्या सत्संगामुळे संगमवाडी परिसरात वाहतूक बदल!

## खासगी बस थांबा तात्पुरता स्थलांतरित

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बागेश्वर महाराज यांच्या संत्सग कार्यक्रमाचे आयोजन सोमवारपासून संगमवाडीतील निकम फार्म येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमानिमित्त संगमवाडी परिसरातील वाहतूक व्यवस्थेत २२ नोव्हेंबरपर्यंत बदल करण्यात आले असून, या भागातील प्रवासी वाहतूक करणारा खासगी बस थांबा खराडी येथे तात्पुरता स्थलांतरित करण्यात आला आहे.**



पिंपरी-चिंचवडहून संगमवाडीतील थांब्यावर येणाऱ्या खासगी बस खडकी, होळकर पूल, येरवडामार्गे खराडी जकात नाका येथे जातील. नगर रस्त्यावरुन पिंपरी-चिंचवडकडे जाणाऱ्या खासगी बस नगर रस्ता,येरवडा, होळकर पूल, खडकीमार्गे इच्छितस्थळी जातील. गणेशखिंड रस्त्याने येणाऱ्या खासगी बस शिवाजीनगर, वेधशाळा चौक, संगम पूल, बंडगार्डन रस्ता, डॉ. आंबेडकर सेतू यामार्गे नगर रस्त्याकडे जातील.

नगर रस्त्यावरुन संगमवाडी बस थांब्यावर येणाऱ्या बससाठी प्रवेश बंद राहणार आहे. खासगी बसचालकांनी वाटेत प्रवाशांच्या सोयीनुसार उतरण्यास सांगावे. खासगी बस संगमवाडीकडे न आणता अन्य ठिकाणी लावाव्यात, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी केले आहे. जुन्या मुंबई-पुणे रस्त्यावरील पाटील इस्टेट परिसरातून संगमवाडी पूलमार्गे येरवड्याकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी वाहतूक बदलांची नोंद घ्यावी. संगमवाडीत होणारी गर्दी विचारात घेऊन आवश्यकत भासल्यास पाटील इस्टेट ते येरवड्यातील सादलबाबा चौक रस्ता वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे.

वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. असे आवाहन वाहतूक पोलीस आयुक्त विजयकुमार मगर यांनी केले आहे.

### मला वाईट इतकंच वाटलं की

» पिंपरी -चिंचवडहून संगमवाडीतील थांब्यावर येणाऱ्या खासगी बस खडकी, होळकर पूल, येरवडामार्गे खराडी जकात नाका येथे जातील. नगर रस्त्यावरुन पिंपरी-चिंचवडकडे जाणाऱ्या खासगी बस नगर रस्ता,येरवडा, होळकर पूल, खडकीमार्गे इच्छितस्थळी जातील. गणेशखिंड रस्त्याने येणाऱ्या खासगी बस शिवाजीनगर, वेधशाळा चौक, संगम पूल, बंडगार्डन रस्ता, डॉ. आंबेडकर सेतू यामार्गे नगर रस्त्याकडे जातील. नगर रस्त्यावरुन संगमवाडी बस थांब्यावर येणाऱ्या बससाठी प्रवेश बंद राहणार आहे. खासगी बसचालकांनी वाटेत प्रवाशांच्या सोयीनुसार उतरण्यास सांगावे. खासगी बस संगमवाडीकडे न आणता अन्य ठिकाणी लावाव्यात, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी केले आहे.

# विनातिकीट प्रवास करणाऱ्यांवर कारवाई

## फुकट्यांकडून कोट्यवधींचा दंड वसूल

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिवाळीच्या काळात विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर रेल्वे प्रशासनाकडून जोरदार कारवाई करण्यात आली आहे. गेल्या १६ दिवसात रेल्वेने तब्बल २२ हजार ८४३ फुकट्या प्रवाशांकडून तब्बल एक कोटी ८२ लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. दिवाळीच्या काळात रेल्वे गाड्यांना तुडुंब गर्दी होती.**

प्रवाशांच्या सोईसाठी रेल्वेने काही विशेष गाड्या देखील सोडल्या होत्या. रेल्वेतील गर्दीचा फायदा घेत काही प्रवासी विना तिकिट प्रवास करतात. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने या फुकट्या प्रवाशांवर कारवाई करण्यासाठी विशेष पथक आणि तिकिट तपासणीस (टीसी) यांची नेमणूक केली होती. त्यानुसार दिवाळीच्या अगोदर व दिवाळीतील काही दिवस अशा १६ दिवसांमध्ये रेल्वेतून विना तिकिट प्रवास करणारे २२ हजार ८४३ प्रवाशांना पकडण्यात आले आहे. त्यानुसार त्यांच्याकडून एक कोटी ८२ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.



### रेल्वे गाड्यांना तुडुंब गर्दी

» दिवाळीच्या काळात रेल्वे गाड्यांना तुडुंब गर्दी होती. प्रवाशांच्या सोईसाठी रेल्वेने काही विशेष गाड्या देखील सोडल्या होत्या. रेल्वेतील गर्दीचा फायदा घेत काही प्रवासी विना तिकिट प्रवास करतात. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने या फुकट्या प्रवाशांवर कारवाई करण्यासाठी विशेष पथक आणि तिकिट तपासणीस (टीसी) यांची नेमणूक केली होती.

याबाबत पुणे रेल्वेचे विभागीय वाणिज्य व्यवस्थापक डॉ. रामदास भिसे यांनी सांगितले, की दिवाळीमध्ये विना तिकिट प्रवास करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी ही विशेष मोहिम हाती घेण्यात आली होती. प्रवाशांनी प्रवास करताना तिकिट काढूनच प्रवास करावा. पुणे विभागात रेल्वेची ५६ स्थानके असून, या स्थानकांवरून दररोज हजारोंच्या संख्येने प्रवासी प्रवास करत आहेत. मात्र, दिवाळी काळात होणाऱ्या गर्दीचा फायदा घेत, काही प्रवासी विना तिकिट प्रवास करत असल्याचे रेल्वेच्या निदर्शनास आले. रेल्वे प्रशासनाने एक ते १६ नोव्हेंबर या कालावधीत तिकिट तपसणीसांमार्फत विशेष तिकिट तपासणी मोहिम हाती घेतली होती.

# आरक्षण न्यायालयात टिकणार नाही; आठवले

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, परंतु 'ओबीसी'च्या आरक्षणाला धक्का लागू नये, अशी भूमिका केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रविवारी मांडली. छगन भुजबळ आणि मनोज जरांगे पाटील यांनी अपापसातील वाद मिटवावा आणि पुढे जाण्याचा प्रयत्न करावा, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. पुण्यात आले असताना आठवले यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत आठवले यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी परशुराम वाडेकर, बाळासाहेब जानराव, मंदार जोशी, वीरेन साठे आदी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकारने प्रयत्न करावे, असे सांगून आठवले म्हणाले, "मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी छगन भुजबळ देखील आग्रही आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी जरांगे पाटील यांचे योग्य असे काम चालू आहे. जातीयवाद समाजातून संपला पाहिजे. जातीनिहाय जनगणना केली पाहिजे आणि त्यातून लोकसंख्येनुसार प्रत्येक जातीला आरक्षण मिळावे, ही आमची भूमिका आहे. तमिळनाडूच्या धर्तीवर मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, 'ओबीसी'मधून मिळालेले आरक्षण हे न्यायालयात टिकणार नाही."

# छठ महापुजानिमित भाविकांची अलोट गर्दी

## काशी येथून आलेल्या पौरोहित्यांनी विधिवत भव्य गंगा आरती

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विश्व श्रीराम सेनेच्या वतीने मोशी येथे इंद्रायणी नदीच्या तीरावर रविवारी (दि.१९) सायंकाळी 'भव्य काशी गंगा आरती'चे आयोजन करण्यात आले होते. भक्ती भावपूर्ण वातावरणात इंद्रायणी मातेची यावेळी काशी येथून आलेल्या पौरोहित्यांनी विधिवत आरती केली.**



यावेळी पालघर हिंदूशक्ती पीठ (PIMPRI)येथील स्वामी श्री भारतानंद सरस्वती महाराज, विश्व हिंदू परिषदेचे सहमंत्री शंकर गायकर, समस्त हिंदू आघाडीचे संस्थापक मिलिंद एकबोटे, आमदार महेश दादा लांडगे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक अर्जुन गुप्ता, भारतीय खाद्य महामंडळ महाराष्ट्र सल्लागार समिती सदस्य व विश्व श्रीराम सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संयोजक डॉ. लालबाबू अंबीकालाल गुप्ता, माजी नगरसेवक धनंजय आल्हाट, सुरेश म्हेत्रे, हभप शेष महाराज, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विश्राम कुलकर्णी, अनिल उपाध्ये, चंद्रकांत तापकीर, गणेश आंबेकर, उमेश सिंगआदींसह हजारो उत्तर भारतीय भक्त भाविक उपस्थित होते. राष्ट्रीय एकतेतून राष्ट्र विकास हे ध्येय ठेवून विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमासह विश्व श्रीराम सेना ही संस्था छठ महापुजा निमित्त भव्य गंगा आरतीचे आयोजन करीत असते. या महोत्सवाची सांगता सोमवारी पहाटे पाच वाजता सूर्योदय झाल्यानंतर सूर्याला अर्ध्य देऊन होणार आहे. सुर्यषष्टी महाव्रत महापूजा, छोटकी छट, भव्य गंगा आरती सह विविध, धार्मिक, सामाजिक, प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### सूर्याची उपासना करण्यासाठी छटपूजेचे व्रत

सूर्याची उपासना करण्यासाठी छटपूजेचे व्रत केले जाते. सर्व मनोकामना पूर्ण करणारे हे व्रत असल्याचे प्राचीन काळापासूनची सामाजिक धारणा आहे. निसर्गात आणि समाजात एकरूपता साधणाऱ्या या व्रतात, आस्था, प्रेम, विश्वास, त्याग आणि पर्यावरण प्रति समर्पणाची भावना आहे अशी माहिती लालबाबु गुप्ता यांनी दिली.

# आळंदी शहरात जलाराम बाप्पाची मिरवणूक मोठ्या उत्साहात साजरी

## जलाराम बाप्पाची 224 वी जयंती उत्साहात

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आळंदी येथे श्री जलाराम दि.19 रोजी सत्संग मंडळाच्यावतीने जलाराम बाप्पाची 224 वी जयंती मोठ्या उत्साहात व आनंदात साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्ताने जलाराम सत्संग मंडळाच्या वतीने जलाराम बाप्पाच्या प्रतिमेची मिरवणूक श्री संतोषी माता मंदिर आळंदी या ठिकाणाहून बँड बाज्याच्या निनादात निघाली.**



या मिरवणुकीत गुजराती बांधव आणि भगिनी यांनी वाद्यांच्या तालासुरात गुजराती नृत्य व दांडिया नृत्य केले. या मिरवणुकीत जलराम मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष व मंदिराच्या निर्मितीचे प्रमुख मगनलालजी राजा यांची प्रतिमाही ठेवण्यात आली होती. या मिरवणुकीने शहरातील ग्रामस्थांची मने वेधून घेतली. या मिरवणुकीचे स्वागत व जलाराम बाप्पाच्या प्रतिमेची पूजन आळंदी पोलीस स्टेशनच्या वतीने वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुनील गोडसे व पोलीस आधिकारी मच्छिंद्र शेंडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तदनंतर नगरपालिका चौकात आळंदी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष तसेच जैन संघ आळंदीचे अध्यक्ष व ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे विद्यमान अध्यक्ष सुरेश काका वडगांवकर यांनी मिरवणुकीचे स्वागत करून जलाराम बाप्पाच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन केले. तसेच नगरपालिकेतील श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेलाही पुष्पहार घालून पूजन केले. तसेच जलाराम सत्संग मंडळांच्या विश्वस्तांचा फेटा बांधून सत्कार करण्यात आला. तदनंतर ही मिरवणूक पुढे माऊलींच्या प्रवेशद्वाराजवळ आली. त्या ठिकाणी ज्ञानेश्वर महाराज संस्थान च्या वतीने माऊली वीर यांनी मिरवणुकीचे स्वागत करून जलाराम बाप्पांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन केले. मंडळाच्या वतीने माऊलीच्या समाधीला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

### महाराष्ट्रातून गुजराती बांधव सहभागी

आळंदी शहरात वारकरी व ग्रामस्थ तसेच पंचक्रोशीतील वयोवृद्ध व्यक्तींच्या डोळ्यांसाठी मोफत उपचार करणारे व वेळप्रसंगी डोळ्याचे मोफत ऑपरेशन करणारे जलाराम सत्संग मंडळ पुणे जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. हे जलाराम सत्संग मंडळ नेहमीच समाजसेवेचे व्रत धारण करत आलेले आहे. महाराष्ट्रातून गुजराती बांधव जलाराम बाप्पांचे भक्त व आळंदीचे ग्रामस्थ सहभागी झाले.

# अॅप्रेंटिसशीप मुळे लाखो रोजगाराच्या संधी – सीताराम कांडी



। पुणे ।महाईन्यूज ।

नॅशनल अॅप्रेंटिसशीप ट्रेनिंग स्कीमच्या माध्यमातून केंद्र सरकार(Pimpri)तर्फे युवकांना रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होत आहेत, असे प्रतिपादन टाटा मोटर्सच्या मनुष्यबळ विभागाचे उपाध्यक्ष व बोर्ड ऑफ अॅप्रेंटिसशीप ट्रेनिंग मुंबईच्या बोर्ड ऑफ गव्हर्नन्सचे चेअरमन सीताराम कांडी यांनी व्यक्त केले. तसेच अॅप्रेंटिसशीप यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कंपन्यांनी पूर्णवेळ कर्मचारी म्हणून सामावून घेण्याचे आवाहन देखील कांडी यांनी केले.

बोर्ड ऑफ अॅप्रेंटिसशीप ट्रेनिंग मुंबई,(Pimpri) महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर्स व पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च रावेत यांच्या संयुक्त विद्यमाने "इंडस्ट्री इन्स्टिट्यूट इंटरॅक्शन मीट व नॅशनल अॅप्रेंटिसशीप ट्रेनिंग स्कीमची यशस्वी अंमलबजावणी" या कार्यशाळेचे आयोजन पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च येथे औद्योगिक आस्थापना व शैक्षणिक संस्था यांच्यामधील दुवा साधण्याकरिता करण्यात आले होते. तसेच शिक्षण मंत्रालय भारत सरकारच्या बोर्ड ऑफ अॅप्रेंटिसशीप ट्रेनिंगच्या अंतर्गत अॅप्रेंटिसशीपचे नवीन नियम समजून घेणे हे देखील या कार्यशाळेचे उद्देश होते. यावेळी नॅशनल अॅप्रेंटिसशीप ट्रेनिंग स्कीमच्या 2.0 या नवीन पोर्टलचा वापर कसा करावा याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

# हवेत विरले आहे, 'अच्छे दिन'चे आश्वासन!




**भारतातल्या निवडणुका दिवसेंदिवस उत्सुकता वाढवत आहेत. साधारणपणे, निवडणुकीत पक्षाचे प्रतिनिधित्व करणारे उमेदवार असतात; पक्षाच्या प्रचाराचे नेतृत्व करणारा नेता असतो; आणि एकूण जागांपैकी बहुमत मिळवणारा पक्ष (स्वतःच्या किंवा समर्थक पक्षांसह) सरकार स्थापन करतो. मोदींसारख्या नेतृत्वाच्या माध्यमातून भाजपने या सगळ्या गोष्टी उलटवून टाकल्या आहेत.**

नरेंद्र मोदी यांनी भाजपचे आणि काही प्रमाणात निवडणुकीचे नियम बदलून टाकले आहेत. भाजपमध्ये त्यांनी अशी परिस्थिती निर्माण केली आहे की तिथे फक्त त्यांचाच शब्द चालतो. पक्षामधले बाकी सगळे मतभेद दडपले गेले आहेत. त्यांच्या निर्देशानुसार, डझनभर केंद्रीय मंत्री आणि विद्यमान खासदार अनिच्छेने विधानसभेची निवडणूक लढवत आहेत. सध्या होऊ घातलेल्या पाच राज्यांमधल्या विधानसभा निवडणुकीत मोदी हेच भाजपचे प्रत्येक मतदारसंघातले उमेदवार आहेत. कोणत्याही राज्यात मते मागायची तर ती मोदींच्या नावावर असेच त्यांच्या पक्षात निर्देश दिले गेले आहेत; भाजपला मत म्हणजे मोदींना, मोदींचे हात बळकट करण्यासाठी मत असंच मोदी लोकांकडे मत मागताना सांगतात. भाजपने यावेळी कोणत्याही राज्यात अमुक व्यक्ती त्या राज्यातला प्रमुख नेता अर्थात संभाव्य मुख्यमंत्री



असेल असे जाहीर केलेले नाही. मध्य प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री शिवराज चौहान यांच्या बाबतीतही पुन्हा तेच मुख्यमंत्री असतील अशी भूमिका घेतलेली नाही. राजस्थान किंवा छत्तीसगडमध्ये अनुक्रमे वसुंधरा राजे आणि रमण सिंह हे पक्षाचे सर्वात जास्त माहीत असलेले चेहरे आहेत. तर मिझोराम आणि तेलंगणामध्ये भाजपला काहीही स्थानच नाही. काँग्रेस आणि इतर प्रतिस्पर्धी पक्ष परंपरागत पद्धतीने निवडणुका लढवत आहेत. त्यांनी बहुतांश मतदारसंघांत व्यक्ति म्हणून स्वतःची ओळख असलेले उमेदवार उभे केले आहेत. विद्यमान मुख्यमंत्री हे छत्तीसगड आणि राजस्थानमधील काँग्रेसच्या प्रचाराचे नेतृत्व करत आहेत; तर मध्य प्रदेशात काँग्रेसच्या माजी मुख्यमंत्र्यांनी तेथील प्रचाराचे नेतृत्व केले आहे. तेलंगणात, मुख्यमंत्री चंद्रशेखर राव आणि मिझोराममध्ये, मुख्यमंत्री झोरमथांगा हे त्यांच्या त्यांच्या पक्षांचा प्रचार करतात. प्रत्येक महत्त्वाच्या किंवा प्रमुख पक्षाच्या प्रचाराची पद्धत वेगवेगळी आहे. केंद्र सरकारने केलेली कामे दाखवून म्हणजे थोडक्यात मोदींवर विसंबून भाजप राज्यासाठी मते मागत आहे.

भाजपने राज्यात सरकार स्थापन केले तर ते डबल इंजिन सरकार असेल, असा दावा केला जात आहे. हिमाचल प्रदेश आणि कर्नाटक राज्यांच्या निवडणुकीत हा डबल इंजिनाचा युक्तिवाद फेटाळण्यात आला. काँग्रेस, बीआरएस आणि एमएनएफ राज्य सरकारने केलेल्या कामाच्या आधारे मते मागत आहेत. मोदींसाठी, पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकांसाठी ही रंगीत तालीम आहे. तर काँग्रेस आणि इतर पक्षांसाठी, संबंधित राज्यात विजयी होणे हे उद्दिष्ट आहे; हे सगळे विधानसभांसाठी चालले आहे. लोकसभेच्या निवडणुकांना अजून तसा वेळ आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून, मोदींनी 'फ्रीबीज' ऊर्फ रेवडी संस्कृतीच्या विरोधात जोरदार टीका केली होती. पण असे असले तरी निवडणुका जाहीर झाल्यावर त्यांच्या पक्षानेच सगळ्यात आधी (छत्तीसगड ७ नोव्हेंबर रोजी) जाहीरनामा प्रसिद्ध केला आणि त्यात विशिष्ट समाजासाठी रोख रकमेच्या आश्वासनासह कितीतरी रेवड्या होत्या. उमेदवारांनी निवडणुकीत किती खर्च करायचा यावर निवडणूक आयोगाची मर्यादा असते. पण त्या नियमाच्या चिंधड्या उडवणाऱ्या मोठमोठ्या प्रचार सभा मोदींनी स्वतःच घेतल्या. या प्रत्येक प्रचार सभेसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले गेले असतील इतक्या त्या मोठ्या होत्या. आणि ते सर्व पैसे कायदेशीर मार्गाने आले असतील आणि कोणाच्या तरी हिशेबात नीट दाखवले गेले असतील यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. बेरोजगारी आणि महागाई या लोकांपुढील चिंतेच्या दोन प्रमुख गोष्टी आहेत. केंद्र सरकारची धोरणे आणि योजनांमुळे लाखो रोजगार निर्माण झाल्याचा दावा भाजपने केला असला तरी बेरोजगारीच्या आकडेवारीच्या पार्श्वभूमीवर (पीरियॉडिक लेबर फोर्स सर्व्हे आणि सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी या दोन्हींची आकडेवारी), भाजपच्या या दाव्याची विश्वासार्हता शून्य आहे. दरवाढीची जबाबदारी पारंपरिकपणे केंद्र सरकारवर असते.

## संपादकीय »

# तोतरी तटस्थता

***संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेमध्ये, मानवी दृष्टिकोनातून गाझा पट्टीत शस्त्रविराम करण्याविषयी विनंती करणारा ठराव शुक्रवारी रात्री बहुमताने संमत झाला.***

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेमध्ये, मानवी दृष्टिकोनातून गाझा पट्टीत शस्त्रविराम करण्याविषयी विनंती करणारा ठराव शुक्रवारी रात्री बहुमताने संमत झाला. शस्त्रविराम तातडीने लागू करून, युद्धग्रस्त गाझातील नागरिकांना मदत पुरवण्याचा मार्ग त्वरित मोकळा झाला पाहिजे अशा साधारण आशयाचा तो ठराव. ठरावाच्या बाजूने, म्हणजे गाझातील पॅलेस्टिनींच्या सहानुभूत्यर्थ १२० देशांनी मतदान केले. ठरावाच्या विरोधात -म्हणजे इस्रायलच्या बाजूने १४ देशांनी मतदान केले. यात अर्थातच अमेरिका आणि इस्रायल यांचा समावेश होता. कोणतीही भूमिका न घेता तटस्थ राहणारे देश ४५ होते. यात भारताचा समावेश होता. त्याची मीमांसा करण्याआधी एक महत्त्वाचा मुद्दा. जगात कोठेही संघर्षाचा भडका उडाला, की 'सर्व प्रश्न चर्चेने सुटावेत अशी भारताची भूमिका आहे. कोणत्याही समस्येचे निराकरण करण्यासाठी युद्धाचा अवलंब करण्याच्या धोरणाविरोधात आम्ही आहोत.

**लोकसभेची निवडणूक जवळ येऊन ठेपल्याने विविध समाज घटकांना खूश करण्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भर दिला आहे. आदिवासींच्या कल्याणासाठी २४ हजार कोटींच्या योजनेचा प्रारंभ त्यांनी केला. याआधी मोदींच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, इतर मागासवर्गीयांपैकी जे पारंपरिक व्यवसाय करतात, त्यांच्यासाठी सुमारे १३ हजार कोटींची विश्वकर्मा योजनेची अंमलबजावणी सुरू झाली होती.**

# निवडणूक प्रचारातच लोककल्याण!

सध्या सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकांच्या प्रचारातच मोदी यांनी सुमारे ८० कोटी भारतीयांना लाभ होईल अशा पाच किलो मोफत अन्नधान्य देण्याच्या योजनेस पाच वर्षांच्या मुदतवाढीची घोषणा छत्तीसगडमध्ये केली. निवडणूक आचारसंहितेची निष्पक्षपाती अंमलबजावणी करणाऱ्या टी. एन. शेषन यांच्यासारखा अधिकारी मुख्य निवडणूक आयुक्तपदी असता, तर मोदी यांना या घोषणांबद्दल नोटीस धाडली गेली असती. तसे काहीही होण्याची शक्यता नसल्याने प्रचाराच्या पुढल्या टप्प्यांत आणखीही घोषणा खुशाल केल्या जाऊ शकतात. आदिवासींमधील असुरक्षित किंवा अतिमागास गटांच्या कल्याणासाठी २४ हजार कोटींच्या योजनेची घोषणा करण्यासाठी मोदी यांनी निमित्त निवडले बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे. आदिवासींतही आता अतिमागास हा प्रवर्ग या योजनेने निर्माण केला आहे. देशातील सुमारे २२० जिल्ह्यांमधील



२८ लाख अतिमागास आदिवासींना या योजनेचा लाभ मिळेल, असे मोदी यांनी झारखंडमधील बिरसा मुंडा यांच्या मूळ गावातून जाहीर केले. रस्ते, दळणवळणाची साधने, वीजपुरवठा, गृहनिर्माण योजना, पाणीपुरवठा, आरोग्य व्यवस्था सुधारणे, शिक्षणाची साधने उपलब्ध करून देणे अशा विविध कामांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. आधीच्या सरकारांनी- म्हणजे काँग्रेसने- आदिवासींकडे दुर्लक्ष केले, त्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने बघितले नाही, अशी नेहमीची टीका मोदींनी केली. पण मोदी सरकार गेली नऊ वर्षे सत्तेत आहे. तेव्हा आदिवासींच्या कल्याणाची आठवण का झाली नाही किंवा हीच वेळ का निवडली? सध्या सुरू असलेल्या चार राज्यांच्या (मिझोराममधील मतदान पूर्ण झाले) विधानसभा निवडणुकांमध्ये आदिवासींची मते लक्षणीय आहेत. मोदींनी भर दिलेल्या आदिवासींमधील असुरक्षित किंवा अतिमागास समाजाचे मतदार चारही राज्यांमध्ये आहेत. मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड आणि तेलंगणामध्ये आदिवासींची मते मिळावीत हा प्रयत्न असेलच, शिवाय आगामी लोकसभेची निवडणूक लक्षात घेता आदिवासींच्या अधिक जवळ जाण्याचा भाजपचा प्रयत्न दिसतो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या आदिवासी असल्याचा उल्लेख पदोपदी करून, आदिवासींची मते जिंकण्याचा प्रयत्न भाजपकडून सुरू असतोच. त्याचाच पुढील भाग म्हणजे २४ हजार कोटींची ही योजना. लोकसभेच्या ४७ जागा या आदिवासी समाज किंवा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. यापैकी ३१ जागा गेल्या वेळी भाजपने जिंकल्या होत्या.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## आरक्षणाच्या मागणीसाठी धनगर समाजाचा

# ठिय्या आंदोलनाचा इशारा!

## » अजित पवारांच्या घरासमोर पोलीस बंदोबस्त

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आरक्षणाच्या मागणीसाठी धनगर समाजाने ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे बारामती येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निवासस्थानासमोर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. एकीकडे मराठा आरक्षणाचा मुद्दा गाजत असताना दुसरीकडे धनगर समाजाला आरक्षण मिळण्याच्या मागणीने जोर धरला आहे.**



आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील २८८ आमदार आणि ४८ खासदारांच्या घरापुढे ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा धनगर समाजाकडून देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामती येथील सहयोग सोसायटीमधील निवासस्थानाच्या बाहेर पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण मिळावे म्हणून बारामती येथे चंद्रकांत वाघमोडे उपोषणाला बसले असून, त्यांच्या उपोषणाचा रविवारी अकरावा दिवस होता. उपोषणाकडे लक्ष न दिल्याने धनगर समाज आक्रमक झाला असल्याचे दिसून येत आहे. पुढच्या टप्प्यात राज्यातील आमदार आणि खासदारांच्या निवासस्थानासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांच्या बारामती येथील सहयोग सोसायटी येथील निवासस्थानाबाहेर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# अचानक मला सुप्रिया ताईंचा फोन आला!

## » भुजबळांवर फर्नांडीस कुटुंबाचं घर लाटल्याचा गंभीर आरोप

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी भुजबळांवर फर्नांडिस कुटुंबाचं घर लाटल्याचा गंभीर आरोप केला. या प्रकरणी त्यांनी भुजबळांच्या घराबाहेर पत्रकार परिषद घेत मोठे खुलासे करणार असल्याचंही जाहीर केलं. मात्र, पोलिसांनी दमानियांना ताब्यात घेतलं. यानंतर आता समीर भुजबळांनी या प्रकरणी प्रतिक्रिया दिली आहे. ते रविवारी (१९ नोव्हेंबर) पत्रकार परिषदेत बोलत होते.**

समीर भुजबळ म्हणाले, “अंजली दमानियांनी आमच्यावर अनेक उलटसुलट आरोप केले. त्यामुळे अनेक गुन्हे दाखल झाले. त्यावरूनच ईडीने आमच्या संपत्तीवर जप्तीची कारवाई केली. त्यात या संपत्तीचाही समावेश होता. याच दमानिया बाईंनी त्यांना पुढे करून आमच्याविरोधात गुन्हा दाखल केला. हे प्रकरण उच्च न्यायालयात गेलं. आमच्या विरोधात पुन्हा एकदा अंजली दमानियांनी डोरिंग फर्नांडीस यांच्या आडून वेगळं कटकारस्थान रचलं.” “ते जेव्हा कोर्टात गेले तेव्हा आम्ही त्यांना विरोध केला नाही. आमच्या वकिलांनीही त्यांना विरोध केला नाही.

न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल दिला, तर तो आम्ही मान्य करावा, अशी आमची भूमिका होती. मात्र, न्यायालयाने ही चुकीची याचिका असल्याचं म्हणत २२ मार्च २०१७ रोजी रद्द केली. तसेच याचिकाकर्त्यांना दिल्लीच्या लवादाकडे दाद मागावी लागेल, असं स्पष्ट केलं. तसेच ते जो निर्णय देतील तो मान्य करावा लागेल, असंही नमूद केलं. यानंतर आजपर्यंत फर्नांडीस यांनी लवादाकडे अपिल केलं नाही. ते लवादाकडे गेले असते, तरी तेथेही आम्ही विरोध करण्याचं काही कारण नव्हतं,” असं समीर भुजबळ यांनी सांगितलं.



समीर भुजबळ पुढे म्हणाले, “अचानक वर्ष दीड वर्षांपूर्वी सुप्रिया ताईंचा मला फोन आला. त्यांनी मला सांगितलं की, त्यांना अंजली दमानियांचा फोन येत आहे. ते प्रकरण काय आहे हे मी त्यांच्याकडे जाऊन सांगावं. मी सुप्रिया ताईंना वाय. बी. चव्हाणला भेटलो, प्रकरण समजून सांगितलं. त्यावेळी मी ज्यांना या व्यवहारासाठी पैसे दिले त्या नरोना यांनाही बरोबर घेऊन गेलो होतो. तेथेही दमानियांनी भांडण केलं आणि नरोना यांना बाहेर काढून दिलं. नरोनाबरोबर आम्हाला चर्चा करायची नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी माझं ऐकून घेतलं आणि आपण एकत्र भेटून मध्यम मार्ग काढू, असं सांगितलं.

” फर्नांडीस यांनी पती वारल्याचं सांगितलं. त्यानंतर मी सुप्रिया सुळेंसमोर त्यांना ५० लाख रुपयांचा चेक दिला. तसेच त्यांच्या काही अडचणी असतील, तर सोडवा असं म्हटलं. हा चेक मी २२ ऑक्टोबर २०२२ रोजी दिला. आता वर्ष झालं आहे. कदाचित दमानियांच्या सांगण्यावरून त्यांनी हा चेकही बँकेत टाकला नसेल. आम्ही कुणाचंही काहीही लाटलेलं नाही,” असंही समीर भुजबळ यांनी नमूद केलं.

### सुप्रिया सुळे यांनी माझं ऐकून घेतलं

» समीर भुजबळ पुढे म्हणाले, “अचानक वर्ष दीड वर्षांपूर्वी सुप्रिया ताईंचा मला फोन आला. त्यांनी मला सांगितलं की, त्यांना अंजली दमानियांचा फोन येत आहे. ते प्रकरण काय आहे हे मी त्यांच्याकडे जाऊन सांगावं. मी सुप्रिया ताईंना वाय. बी. चव्हाणला भेटलो, प्रकरण समजून सांगितलं. त्यावेळी मी ज्यांना या व्यवहारासाठी पैसे दिले त्या नरोना यांनाही बरोबर घेऊन गेलो होतो. तेथेही दमानियांनी भांडण केलं आणि नरोना यांना बाहेर काढून दिलं. नरोनाबरोबर आम्हाला चर्चा करायची नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी माझं ऐकून घेतलं आणि आपण एकत्र भेटून मध्यम मार्ग काढू, असं सांगितलं.”

# काँग्रेसवाले एकमेकांना बाद करत आहेत!

## काँग्रेसने राजस्थानमध्ये भ्रष्टाचार केला : पंतप्रधान मोदी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राजस्थान विधानसभा निवडणुकीसाठी २३ नोव्हेंबरला मतदान पार पडणार आहे. त्यातच आज ( १९ नोव्हेंबर ) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची राजस्थानमधील चुरू येथे सभा पार पडली. यावेळी क्रिकेटचा संदर्भ घेत पंतप्रधानांनी काँग्रेसला लक्ष्य केलं आहे. काँग्रेसवाले एकमेकांना धावबाद करत आहेत. जे पक्षात शिल्लक राहिलेत त्यांच्याही विकेट पडत आहेत. भाजपा राजस्थानचे चषक जिंकत आहे, असं पंतप्रधान मोदींनी म्हटलं.**



“राजस्थानमध्ये भाजपाचं सरकार स्थापन झाल्यावर ३ डिसेंबरपासून प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यात १२ हजार रूपये मिळणार,” असं आश्वासन पंतप्रधान मोदींनी दिलं आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, “या भूमीच्या प्रत्येक कणात भक्ती आणि शक्ती आहे. काँग्रेसचे लोक एकमेकांना धावबाद करत आहे. पक्षात उरलेल्यांचीही महिला आणि अन्य प्रश्नांवर चुकीची विधाने केल्याने विकेट पडत आहे. बाकीचे लाच घेऊन सामना फिक्सिंग करत आहेत.” “संघाची परिस्थिती अशी असेल, तर ते धावा कशा काढणार? आणि तुमच्यासाठी काय काम करणार? लाल डायरीची पाने हळू-हळू उघडत आहेत, तसं मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या फ्यूज उडत आहेत. मुख्यमंत्र्यांची जादू लाल डायरीत दिसत आहे. आपल्याला प्रत्येक बूथवर पाच ते सहा शतके लगवायची आहेत. काँग्रेसने प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे. भाजपाचं सरकार आल्यानंतर सर्व भ्रष्टाचारी लोकांची विकेट घ्यायची आहे,” असं पंतप्रधानांनी म्हटलं. “राजस्थानमधील शेतकरी, महिला आणि तरूणांच्या भविष्याचा हा विजय असेल. या मातीतील तरूण देशाला सुरक्षित ठेवण्यासाठी मोठी भूमिका बजावत आहेत. या विरांचा छळ करण्याचं काम काँग्रेसने केलं आहे. काँग्रेसच्या राज्यात देवाचं नाव घेणंही अवघड झालं आहे,” असा आरोप मोदींनी केला आहे.

### मोदी पुन्हा पंतप्रधान बनविणे हे ध्येय

» भाजपाच्या बैठकीनंतर प्रतिक्रिया देताना अशोका म्हणाले, “नरेंद्र मोदी पुन्हा एकदा देशाचे पंतप्रधान व्हावेत, एवढीच आमची अपेक्षा आहे. त्यामुळेच नवा विरोधी पक्षनेता निवडताना कोणतीही शंका किंवा अडतळा निर्माण होऊ न देण्याचा प्रयत्न आम्ही केला. मी स्वतः सुनील कुमार आणि अश्वथनारायण यांच्याशी बोललो. कुणीही विरोधी पक्षनेता झाला तरी आम्हाला अडचण नव्हती. पण पक्षाचे हित सर्वप्रथम आहे आणि मोदी यांना पुन्हा एकदा पंतप्रधान बनविणे हे ध्येय.

# हलाल प्रमाणपत्र देणाऱ्या संस्थांविरोधात एफआयआर

## काही जणांविरोधात पोलिस ठाण्यात गुन्हा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हलाल प्रमाणित उत्पादनांवर सातत्याने वाद निर्माण होत आहेत. आता उत्तर प्रदेशातील योगी सरकारने राज्यात हलाल प्रमाणित उत्पादनांच्या विक्रीवर बंदी घातली आहे. राज्यात तेल, साबण, टूथपेस्ट यासारख्या हलाल प्रमाणित शाकाहारी उत्पादनांच्या विक्रीची दखल घेत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अधिकाऱ्यांना कारवाई करण्यास सांगितले आहे. शनिवारी संध्याकाळी, यूपी सरकारने राज्याच्या हद्दीत हलाल प्रमाणित उत्पादनांच्या विक्रीवर बंदी घालण्याचा आदेश जारी केला.**



### शाकाहारी पदार्थांची अजिबात गरज नाही

» ज्या शाकाहारी पदार्थांची अजिबात गरज नाही त्यांना हलाल प्रमाणपत्र दिले जात आहे. कायद्यानुसार अन्न उत्पादनांना गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यासाठी ISI आणि FSSAI या अधिकृत संस्था असून इतर कोणत्याही अधिकृत संस्था नाहीत. योगी सरकारच्या या कारवाईनंतर अन्न आणि औषध प्राधिकरणाच्या (एफडीए) अधिकाऱ्यांना राज्यात हलाल प्रमाणपत्र असलेल्या उत्पादनांच्या विक्रीवर बंदी घालण्याचे मार्ग शोधण्यास सांगितले आहे.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या निर्देशानुसार लखनौ पोलीस आयुक्तालयात विविध उत्पादनांना हलाल प्रमाणपत्र देणाऱ्या संस्थांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. शनिवारी चेन्नईतील हलाल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, दिल्लीतील जमीयत उलेमा हिंद हलाल ट्रस्ट, मुंबईतील हलाल कौन्सिल ऑफ इंडिया आणि जमियत उलेमासह काही जणांविरोधात हजरतगंज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भारतीय दंड संहितेच्या (IPC) कलम १२० ब १५३ अ, २९८, ३८४, ४२०, ४६७, ४६८ आणि ५०५ अंतर्गत गुन्हे दाखल झाले आहे. शैलेंद्र शर्मा यांनी दाखल केलेल्या एफआयआरमध्ये या संस्था हलाल सर्टिफिकेट असलेली काही उत्पादने एका विशिष्ट धर्माच्या ग्राहकांना बेकायदेशीरपणे विकत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

एफआयआरमध्ये तक्रारदाराने म्हटले आहे की, या संस्थांनी हलाल प्रमाणपत्र तयार करून आर्थिक लाभ मिळवून फसवणूक केल्याचा आरोप आहे. या संस्थांकडून मोठे षडयंत्र रचले जात असून या व्यवसायातून मिळणारा पैसा देशविरोधी कारवायांमध्ये वापरला जात असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. उत्तर प्रदेश सरकारच्या अधिकृत प्रवक्त्याने सांगितले की मुख्यमंत्री योगी यांनी या बेकायदेशीर कृतीची तीव्र दखल घेतली आहे.

# संवैधानिक नैतिकता नाकारू शकत नाही!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

विद्यमान सामाजिक पद्धतींबरोबर तणाव निर्माण होतो, या कारणासाठी आपण संवैधानिक नैतिकता नाकारू शकत नाही, असे स्पष्ट मत सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी व्यक्त केले. सरन्यायाधीश म्हणून ९ नोव्हेंबर रोजी न्या. चंद्रचूड यांना एक वर्ष पूर्ण झाले. त्यानिमित्त दिलेल्या विशेष मुलाखतीत त्यांनी अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर आपली मते मांडली. संविधानाच्या नजरेतून विद्यमान भारतीय संस्कृतीकडे पाहिल्यास विरोधाभास निर्माण होऊ शकतो. आपली राज्यघटना दुसऱ्याचे अनुकरण असल्याचेही बोलले जाते. याबाबत न्या. चंद्रचूड यांना विचारले असता ते म्हणाले, की काही संवैधानिक मूल्ये ही वैश्विक असतात. अन्य काही देशांनी अंगीकारलेली अशी काही मूल्ये घटनाकारांनी भारतीय राज्यघटनेत समाविष्ट केली व भारतीय जीवनाशी समरस होण्याकरिता त्यांच्यात आवश्यक बदल केले. राज्यघटना तयार झाल्यानंतरही त्यात शंभरापेक्षा जास्त दुरुस्ती करण्यात आल्याकडे न्या. चंद्रचूड यांनी लक्ष वेधले. अनेक पिढ्यांनी संसदेच्या माध्यमातून घटनादुरुस्तीच्या प्रक्रियेद्वारे आपल्या स्वत:च्या आकांक्षांना वाचा फोडल्याचे ते म्हणाले. यासाठी त्यांनी पंचायतराज आणि जीएसटी परिषदेसारख्या केवळ घटनादुरुस्तीच्या आधारे तयार झालेल्या यंत्रणांचे उदाहरण दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने (कॉलेजियम) न्यायाधीशांची नावे सुचविताना ‘विविधता’ हे धोरण म्हणून स्वीकारले आहे. त्यामुळे विविध उच्च न्यायालयांमध्ये लिंग, जात आणि प्रादेशिक विविधतेचा समावेश आढळून येतो, असे न्या. चंद्रचूड यांनी सांगितले. देशभरातील न्यायाधीशांच्या ज्येष्ठतेसह विविधतेचा समतोल साधण्याचा प्रयत्नही केला जात असल्याचे ते म्हणाले. संसद आणि न्यायालय यांची संस्थात्मक रचना आणि अधिकार वेगवेगळे आहेत. मात्र काही प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या हस्तक्षेपाची आवश्यकता असते. महत्त्वपूर्ण सामाजिक बदल घडविणारे कायदे संसदेत होऊ शकतात, मात्र त्यातून वैयक्तिक प्रकरणांमध्ये अधिकारांचे उल्लंघन थांबविणे शक्य नसते.

# वर्ल्डकप पराभवानंतर कलाकारांचा भारतीय क्रिकेट संघाला पाठिंबा!

नुकताच भारत आणि ऑस्ट्रेलिया संघांमध्ये विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना खेळवला गेला. या सामन्यात भारताचा एकतर्फी पराभव झाला. अंतिम सामन्यात भारताचा झालेला हा पराभव सर्वांच्याच जिव्हारी लागला. भावूक झालेल्या खेळाडूंना पाहून समस्त भारतीयांचे डोळेही पाणावले.

अशातच बॉलिवूड सेलिब्रिटींनी खेळाडूंची पाठराखण करत त्यांना सपोर्ट करताय. बघा काय आहेत बॉलिवूड सेलिब्रिटींच्या प्रतिक्रिया अभिनेता अभिषेक बच्चनने X वर लिहिले, "चांगल्या प्रयत्नानंतर एक कठीण पराभव. संपूर्ण निळ्या रंगातील पुरुषांची प्रशंसनीय कामगिरी. तुम्ही आमची मान





अभिमानाने उंचावलीय. या प्रवासासाठी धन्यवाद. चित्रपट निर्माते दिग्दर्शक विवेक रंजन अग्निहोत्री यांनी X वर लिहिले, "अभिनंदन ऑस्ट्रेलिया. चांगले खेळला, भारत." अभिनेता सोनू सूदने इंस्टाग्राम स्टोरीजवर लिहिले की, "टीम इंडिया तुम्ही आमचे कायमचे हिरो आहात अभिनेत्री काजोलने इंस्टाग्राम स्टोरीजवर लिहिले, "हार कर जितने वाले को बाजीगर कहते हैं! टीम इंडिया चांगली खेळली. ऑस्ट्रेलियाचे आणखी एका विश्वचषकासाठी अभिनंदन! अभिनेता आयुष्मान खुरानाने अभिनेता रणवीर सिंग आणि क्रिकेटर हार्दिक पांड्यासोबतचा एक फोटो इन्स्टाग्राममध्ये पोस्ट केला आहे. त्याने लिहिले की, "पराजयाबद्दल खूप वाईट वाटले पण या भारत - ऑस्ट्रेलियामध्ये टक्कर होणे चांगले होते."

## आता देशभक्तीपर.. मॅडी बोलून गेला?

प्रसिद्ध अभिनेता आर माधवन हा नेहमीच त्याच्या परखड प्रतिक्रियांसाठी ओळखला जाणारा सेलिब्रेटी आहे. त्याच्या रॉकेट्री या चित्रपटानं प्रेक्षकांच्या मनात घर केले होते. आता माधवननं एका कार्यक्रमात सध्याच्या चित्रपटविश्वातील घडामोडींकडे लक्ष वेधले असून त्यावर केलेलं भाष्य हे चर्चेत आलं आहे. मॅडी म्हणाला की, भारतानं आता वेगवेगळ्या विषयांवर चित्रपट बनवणे गरजेचे आहे. केवळ विज्ञानावर आधारितच नव्हे तर भारताच्या ग्रामीण भागातील विविध विषय देखील यावेळी जगाच्या समोर यायला हवे. त्यातील आशय फारच ताकदीचा आहे. त्यात प्रेक्षकांना आकर्षित करण्याची क्षमता देखील आहे. अशावेळी आपण त्याच त्याच विषयांमध्ये का अडकून पडतो असा प्रश्न माधवननं यावेळी उपस्थित केला. अमर उजालाशी संवाद साधताना माधवननं वेगवेगळ्या गोष्टींवर त्याची भूमिका मांडली आहे. भारत आता आपल्या सामर्थ्यासाठी ओळखला जातो आहे. अशावेळी आपण नाविन्यपूर्ण विषयांना जगासमोर आणायला हवे. आपली अर्थव्यवस्था देखील मजबूत झाली आहे. आपण वेगवेगळ्या आव्हानांचा सामनाही करतो आहे.

## अनुष्का शर्माचेही डोळे पाणावले



भारताने आज ऑस्ट्रेलियाविरुद्ध वर्ल्डकप सामना गमावला. भारतीय क्रिकेट संघाच्या पराभवाने सर्व भारतीयांना नक्कीच वाईट असेल. भारताने यंदाच्या वर्ल्डकपमध्ये एकही सामना गमावला नव्हता. आणि वर्ल्डकप फायनलमध्ये भारताला पराभव पत्करावा लागल्याने सर्वांनाच दुःख झालंय. विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा ६ विकेट्सने पराभव केला. भारताचे स्वप्नभंग करत ऑस्ट्रेलियाने सहाव्यांदा विश्वचषकावर नाव कोरले. टीम इंडियाचे २४१ धावांचे आव्हान ऑस्ट्रेलियाने सहजरित्या गाठले. दरम्यान, भारताच्या हातातोंडाशी आलेला खास ऑस्ट्रेलियाने हेरावून घेतल्याने टीम इंडियातील अनेक खेळाडूंना अश्रू अनावर झाले. कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली हे भर मैदानात भावनिक झालेले पाहायला मिळाले. ऑस्ट्रेलियाने पराभव केल्यानंतर कर्णधार रोहित शर्मा अश्रू अनावर झाल्याने मैदानाच्या बाहेर निघून गेला. भारताच्या सर्व खेळाडूंना अश्रू अनावर झाले. यावेळी विराट कोहली भावनिक झाला होता. त्याला पत्नी अनुष्काने मिठी मारत सावरण्याचा प्रयत्न केला. विराट-अनुष्काचा एक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिंसने पत्रकार परिषदेत दिलेल्या शब्द खरा करुन दाखवला आहे. यंदाच्या वर्ल्डकपमध्ये प्रत्येक मॅचला क्रिकेटपटू विराट कोहलीची पत्नी अभिनेत्री अनुष्का शर्मा टीमला सपोर्ट करायला उपस्थित होती. पण भारतीय क्रिकेट संघाच्या पराभवामुळे अनुष्का सुद्धा दुःखी झालेली दिसली. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यानंतर, रविवारी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये भारताला पराभव पत्करावा लागला. लाखो भारतीयांप्रमाणेच अभिनेत्री अनुष्का शर्मा, अथिया शेट्टी आणि क्रिकेटपटूंच्या कुटुंबातील इतर सदस्यही स्टेडियममध्ये भावूक होताना दिसले. सामना संपल्यावर अनुष्का भावूक झालेली दिसली. अनुष्का शांतपणे मैदानात बघत होती. समस्त भारतीयांप्रमाणे अनुष्काही तिचं दुःख लपवू शकत नव्हती. याशिवाय रोहितची पत्नी रितिकाच्या डोळ्यात पाणी आलं होतं. केएल राहुलची पत्नी, अभिनेत्री अथिया शेट्टीसुद्धा भावूक झालेली दिसली. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यानंतर, रविवारी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये भारताला पराभव पत्करावा लागला. लाखो भारतीयांप्रमाणेच अभिनेत्री अनुष्का शर्मा, अथिया शेट्टी आणि क्रिकेटपटूंच्या कुटुंबातील इतर सदस्यही स्टेडियममध्ये भावूक होताना

## बायको तर आलीच, सासरेबूवांनी लावली हजेरी

वर्ल्ड कप २०२३ च्या फायनलच्या सामन्याची उत्सुकता आता शिगेला पोहचली आहे. सोशल मीडियावर तर वेगवेगळ्या प्रकारे वर्ल्ड कप फिव्हरची चर्चा सुरु आहे. यापूर्वीच्या भारत विरुद्ध न्युझीलंडच्या सामन्याला बॉलीवूड सेलिब्रेटींनी गर्दी केली होती. त्यानंतर आजच्या शेवटच्या सामन्याला दिग्गज सेलिब्रेटींनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. रणवीर आणि दीपिका हे नेहमीच चाहत्यांचे फेव्हरेट राहिले आहेत. त्यांनी देखील आजच्या फायनलला उपस्थिती दर्शवत चाहत्यांना प्रतिक्रिया देण्यास भाग पाडले आहे. रणवीर हा त्याच्या अजब तऱ्हेच्या फॅशनसाठी ओळखला जाणारा सेलिब्रेटी आहे. आजच्या सामन्याला देखील त्यानं वेगळ्या प्रकारे ड्रेसिंग करत चाहत्यांचे लक्ष वेधले आहे. दुसरीकडे दीपिका अन् तिचे वडील प्रकाश पदुकोण हे देखील मॅच पाहण्याचा आनंद घेताना दिसून आले आहे. यापूर्वी बॉलीवूडचा किंग खान शाहरुख त्याचा मुलगा आर्यन खान, सुहाना अन् अब्राहमच्या फोटोंनी चाहत्यांच्या प्रतिक्रियांना उधाण आले होते. मुंबईतील सेमीफायनलच्या सामन्याला थलायवा रजनीकांत यांच्या उपस्थितीनं प्रेक्षक भारावून गेले होते. त्यानंतर आता फायनलच्या सामन्याला देखील सेलिब्रेटींनी आपल्या उपस्थितीनं टीम इंडियाला चिअर अप केले आहे. दीपिका, रणवीरच्या फोटोंवर नेटकऱ्यांनी दिलेल्या कमेंटसही भन्नाट आहेत. त्यांच्या फोटोंनी चाहत्यांच्या उत्साहाला उधाण आले आहे. याआगोदर वेगवेगळ्या शो च्या निमित्तानं किंवा प्रमोशनसाठी हे दोन्ही सेलिब्रेटी एकत्र आले होते. त्यानंतर आता ते फायनलच्या सामन्याला त्यांनी लावलेली हजेरी त्यात रणवीरच्या सासरेबुवांनी घेतलेली इंट्री सोशल मीडियावर चर्चेचा विषय आहे.

## आशाताईंसाठी केलेल्या किंग खानच्या कृतीने जिंकली नेटकऱ्यांची मनं

साऱ्या देशाचं लक्ष ज्या सामन्याकडे लागलं आहे त्या भारत विरुद्ध ऑस्ट्रेलियामध्ये वर्ल्ड कपच्या फायनलचा सामना रंगतो आहे. भारतानं पहिल्यांदा फलंदाजी करताना २४० धावा केल्या आहेत. त्यावर ऑस्ट्रेलियानं सावध सुरुवात केली होती. मात्र हाती आलेल्या माहितीनुसार त्यांनी तीन विकेट गमावल्या आहेत. या सगळ्यात बॉलीवूडच्या सेलिब्रेटींनी भारतीय क्रिकेट टीमचा पाठींबा देण्यासाठी मोदी स्टेडियमवर धाव घेतल्याचे दिसून आले. त्यात किंग खान शाहरुखपासुन रणवीर सिंह पर्यंत अनेकांची उपस्थिती प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत होती. अशातच शाहरुखचा तो व्हिडिओ समोर आला आणि तो त्याच्या चाहत्यांच्या, नेटकऱ्यांच्या कौतुकाचा विषय झाला आहे. फायनलच्या सामन्यासाठी प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांनी देखील हजेरी लावली होती. त्यांचा तो व्हिडिओ चहा पितानाचा व्हिडिओ आणि तो चहाचा कप शाहरुखनं उचलून घेणे यावर नेटकऱ्यांनी किंग खानचे कौतुक केले आहे. त्याला नेटकऱ्यांकडून मिळालेल्या प्रतिक्रिया देखील चर्चेचा विषय आहे. फायनलला किंग खान त्याचा मुलगा आर्यन खान, सुहाना, पत्नी गौरी उपस्थित आहे. रणवीर सिंग, दीपिका पदुकोण तिचे वडील प्रकाश पदुकोण यांच्या उपस्थितीनं प्रेक्षकांना जिंकून घेतले आहे. यात शाहरुखच्या त्या व्हिडिओची बराचवेळ चर्चा सुरु होती. शाहरुख खान आशाताईंसोबत संवाद साधत असताना त्यानं आशा ताईंकडून तो चहाचा कप घेतला आणि दुसऱ्या कर्मचाऱ्याकडे दिल्याचे दिसून आले. त्या व्हिडिओनं मात्र किंग खानवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. एका नेटकऱ्यानं शाहरुखचं कौतुक करताना म्हटलं आहे की, यामुळेच शाहरुख हा सगळ्यांच्या आवडीचा अभिनेता आहे. तो खूपच प्रेमळ आणि कौतुकास पात्र असणारा सेलिब्रेटी आहे.

# ऑस्ट्रेलियाचा वर्ल्डकप विजयाचा षटकार

## अब की बार 'हेड'चा शांत डोक्यानं टीम इंडियावर 'वार'

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलियाने टीम इंडियाचा ६ विकेट्सने पराभव करत भारताचे स्वप्नभंग केले आहे. कांगारूंनी सहाव्यांदा विश्वचषक आपल्या नावावर केला आहे. टीम इंडियाने दिलेल्या २४१ धावांच्या आव्हानाचा ऑस्ट्रेलियाने यशस्वीरित्या पाठलाग केला. ट्रायव्हस हेडची शतकी खेळी आणि ऑस्ट्रेलियाच्या उत्कृष्ट गोलंदाजीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने हा ऐतिहासिक विजय मिळवला आहे. हा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवण्यात आला होता.**

नाणेफेक जिंकत ऑस्ट्रेलियाने गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि टीम इंडियाला २४० धावांमध्ये रोखण्यात यश मिळवले. यानंतर भारताने ऑस्ट्रेलियाला ३ धक्के दिले. मात्र, चौथ्या विकेटसाठी ट्रायव्हस हेड आणि मार्नस लाबुशेन यांनी मोठी भागीदारी रचली आणि भारताला सामन्यातून बाहेर केले. भारताकडून जसप्रीत बुमराहने ३ तर मोहम्मद शमीने १ विकेट पटकावली. तत्पूर्वी, ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघ २४० धावांत ऑलआऊट झाला. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारताने ऑस्ट्रेलियाला विजयासाठी 241 धावांचे लक्ष्य ठेवले आहे. भारताकडून केएल राहुलने सर्वाधिक ६६ आणि विराट कोहलीने ५४ धावा केल्या. कर्णधार रोहित शर्माने 47 आणि सूर्यकुमार यादवने 18 धावा केल्या. कुलदीप यादवने 10 धावांचे योगदान दिले. या पाच खेळाडूंशिवाय कोणीही दुहेरी आकडा गाठू शकला नाही. रवींद्र जडेजा नऊ, मोहम्मद शमी सहा, श्रेयस अय्यर आणि शुभमन गिल प्रत्येकी चार धावा करून बाद झाले. जसप्रीत बुमराहला एकच धाव करता आली. मोहम्मद सिराज नऊ धावा करून नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्कने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या. पॅट कमिन्स आणि जोश हेझलवूड यांना प्रत्येकी दोन यश



मिळाले. ग्लेन मॅक्सवेल आणि अॅडम झाम्पाने प्रत्येकी एक विकेट घेतली. भारतासाठी या सामन्यात विराट कोहली आणि केएल राहुल यांनी चौथ्या विकेटसाठी ६७ धावांची सर्वात मोठी भागीदारी केली. रोहित शर्मा आणि विराट कोहलीने दुसऱ्या विकेटसाठी 46 धावांची भागीदारी केली. रोहित, कोहली आणि राहुलला चांगली सुरुवात मोठ्या डावात करता आली नाही. श्रेयस अय्यर, शुभमन गिल, सूर्यकुमार मोठ्या क्षणी अपयशी ठरले. आता संपूर्ण जबाबदारी गोलंदाजांवर आहे. त्याच्याकडून धोकादायक गोलंदाजीची अपेक्षा आहे. ग्लेन मॅक्सवेलनं विजयी फटका मारल्यानंतर एकीकडे ऑस्ट्रेलियाचे खेळाडू जल्लोष करत मैदानात येत असताना दुसरीकडे भारतीय खेळाडूंना भावना अनावर झाल्याचं दिसत होतं. खुद्द कर्णधार रोहित शर्मालाही अश्रू अनावर झाले. सघळ्यांना हस्तांदोलन केल्यानंतर रोहित शर्मा वेगाने ड्रेसिंग रुमच्या दिशेनं मैदानाबाहेर पडला. यावेळी त्याच्या डोळ्यांत अश्रू स्पष्टपणे दिसत होते. सामन्यानंतरच्या कार्यक्रमात रोहित शर्माला रवी शास्त्रींनी पराभवासंदर्भात प्रतिक्रिया विचारली असता रोहित शर्मानं आपल्या सहकाऱ्यांच्या कामगिरीवर अभिमान असल्याचं ताठ मानेनं सांगितलं. "सामन्याचा निकाल आमच्या बाजूने लागला नाही. आज आम्ही विजयासाठी आवश्यक तेवढा चांगला खेळ करू शकलो नाही याची आम्हाला कल्पना आहे. पण मला संघातल्या प्रत्येकाच्या कामगिरीचा अभिमान आहे", असं रोहित शर्मा यावेळी म्हणाला. "खरंतर आणखी २०-३० धावा झाल्या असत्या, तर कदाचित आम्हाला आणखी मदत झाली असती. जेव्हा विराट कोहली आणि के. एल. राहुल खेळत होते, तेव्हा आम्ही २७०-२८० धावांचं लक्ष्य समोर ठेवलं होतं. पण सातत्याने आमचे गडी बाद होत गेले", असं रोहित शर्मानं यावेळी कबूल केलं. दरम्यान, यावेळी बोलताना रोहित शर्मानं ट्रॅविस हेड व मार्नस लाबुशेन यांच्या भागीदारीचं कौतुक केलं. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी १९२ धावांची विजयी भागीदारी केली. "तीन गडी बाद झाल्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी एक मोठी भागीदारी रचली.

### मला माझ्या सहकाऱ्यांचा अभिमान

» सामन्यानंतरच्या कार्यक्रमात रोहित शर्माला रवी शास्त्रींनी पराभवासंदर्भात प्रतिक्रिया विचारली असता रोहित शर्मानं आपल्या सहकाऱ्यांच्या कामगिरीवर अभिमान असल्याचं ताठ मानेनं सांगितलं. "सामन्याचा निकाल आमच्या बाजूने लागला नाही. आज आम्ही विजयासाठी आवश्यक तेवढा चांगला खेळ करू शकलो नाही याची आम्हाला कल्पना आहे. पण मला संघातल्या प्रत्येकाच्या कामगिरीचा अभिमान आहे", असं रोहित शर्मा यावेळी म्हणाला. आम्ही त्यांचे तीन गडी बाद केलेही. पण ऑस्ट्रेलियाच्या विजयाचं श्रेय ट्रॅविस हेड व मार्नस लाबुशेन यांना दिलं पाहिजे", असं रोहित शर्मानं नमूद केलं. "त्यांनी हा सामना आमच्या हातातून काढून नेला. मला वाटतं संध्याकाळी खेळपट्टी फलंदाजीसाठी आणखी चांगली झाली. हे असं होईल याची आम्हाला कल्पना होती. पण अर्थात, या पराभवासाठी मला ते कारण द्यायचं नाहीये. आम्ही चांगली फलंदाजी केली नाही.

# पराभवानंतर विराट भावूक अश्रू झाले अनावर

## विराट अनुष्का यांचा हा फोटो चांगलाच झाला व्हायरल

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा ६ विकेट्सने पराभव केला. भारताचे स्वप्नभंग करत ऑस्ट्रेलियाने सहाव्यांदा विश्वचषकावर नाव कोरले. टीम इंडियाचे २४१ धावांचे आव्हान ऑस्ट्रेलियाने सहजरित्या गाठले. दरम्यान, भारताच्या हातातोंडाशी आलेला खास ऑस्ट्रेलियाने हेरावून घेतल्याने टीम इंडियातील अनेक खेळाडूंना अश्रू अनावर झाले. कर्णधार रोहित शर्मी आणि विराट कोहली हे भर मैदानात भावनिक झालेले पाहायला मिळाले.**

ऑस्ट्रेलियाने पराभव केल्यानंतर कर्णधार रोहित शर्मा अश्रू अनावर झाल्याने मैदानाच्या बाहेर निघून गेला. भारताच्या सर्व खेळाडूंना अश्रू अनावर झाले. यावेळी विराट कोहली भावनिक झाला होता. त्याला पत्नी अनुष्काने मिठी मारत सावरण्याचा प्रयत्न केला. विराट-अनुष्काचा एक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिंसने पत्रकार परिषदेत दिलेल्या शब्द खरा करुन दाखवला आहे.

भारतीय प्रेक्षकांनी मैदान तुडुंब भरलेले असेल आम्ही सर्व प्रेक्षकांना शांत करुन दाखवू, असे पॅट कमिंस म्हणाला होता. त्याचा हा शब्द त्याने सत्यात उतरवला आहे. विश्वचषकावर सहाव्यांदा मोहर



उमटवत त्याने भारतीय प्रेक्षकांमध्ये पिन ड्रॉप सायलेंस केला होता. ऑस्ट्रेलियन संघासमोर कोणत्या भारतीय खेळाडूचे आव्हान असेल, या प्रश्नाला उत्तर देताना कमिन्स म्हणतो, "भारत हा एक चांगला संघ आहे. मोहम्मद शमी हा मोठा (धोका) आहे." क्रिकेट विश्वचषक अंतिम सामन्याच्या खेळपट्टीबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना कमिन्सने म्हटले की, "दोन्ही संघांसाठी हे स्पष्टपणे सारखेच आहे. आपल्याच देशात खेळण्याचे काही फायदे आहेत यात शंका नाही. पण आम्ही इथे खूप क्रिकेट खेळलो आहोत." भारताचा स्टार क्रिकेटर विराट कोहली हा आजच्या अंतिम सामन्यानंतर खूप भावूक झाल्याचं पाहण्यास मिळालं. विराट कोहलीने आजच्या सामन्यात ६३ चेंडूंमध्ये चार चौकारांसह ५४ धावांची खेळी केली. मात्र २९ व्या षटकात तो पॅट कमिन्सच्या चेंडूवर तो क्लिन बोल्ड झाला. त्यानंतर मैदानात एकच शांतता पसरली होती. या सामन्यात भारताला २४० धावांपर्यंतच मजल मारता आली. कारण ऑस्ट्रेलियाच्या संघाने भारताला सुरुवातीपासूनच आटोक्यात ठेवत क्षेत्ररक्षण आणि गोलंदाजी केली. सलग १० सामने जिंकलेला भारत विश्वचषकावरही आपलं नाव कोरेल असं वाटलं होतं. मात्र तसं घडलं नाही, अंतिम सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियन संघाने सहा विकेट्सनी हरवलं. त्यानंतर विराट जेव्हा परतला तेव्हाचा त्याचा फोटो व्हायरल होतो आहे.

### काय दिसतं आहे फोटोत?

» सामन्यातल्या पराभवानंतर जेव्हा सगळे खेळाडू परतले तेव्हा रोहीत शर्मा, केएल राहुल, सिराज यांना अश्रू अनावर झाले. विराटही त्यांच्यात होता तो खूपच भावूक झाला होता. त्याच्यासाठी पत्नी अनुष्काला भेटणं आवश्यक होतं. तो अनुष्काजवळ गेला आणि त्याने अनुष्काला घट्ट मिठी मारली. अनुष्कानेही या पराभवानंतर त्याला आधार दिला. जणू काही तुझं काही चुकलं नाहीये रे.. असंच ती त्याला सांगत असावी. विराट पाठमोरा आहे आणि अनुष्का त्याला मिठीत घेऊन समजावते आहे हा फोटो सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे.